# बृहन्मुंबई महानगरपालिका
## सार्वजनिक आरोग्य खाते
### क्षयरोग रुग्णालय समूह, शिवडी-15.
### काआअ/14432/क्षरुस(वआ) दि.20.01.2025

## पुर्नजाहिरात

सार्वजनिक आरोग्य खात्यांतर्गत क्षयरोग रुग्णालय समूहाच्या आस्थापनेवरील **'दुरध्वनीचालक'**संवर्गातील 02 पदे एका वर्षाकरिता कंत्राटी तत्वावर प्रत्येकी 6 महीन्यानंतर एक दिवसाचा तांत्रिक खंड देऊन मासिक ठोस मानधन रु.14,000/- (रुपये चौदा हजार फक्त) इतक्या वेतनावर भरण्याकरिता खालील नमूद अर्हता धारण केलेल्या उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

**'दुरध्वनीचालक'-2 पदे**

**शैक्षणिक अर्हता-**

1. उमेदवार शालांत परिक्षेत दुस-या प्रयत्नात उत्तीर्ण झालेला असल्यास, मिळालेल्या एकूण गुणातून 10 गुण कमी करण्यात येतील आणि तिस-या प्रयत्नात उत्तीर्ण झालेला असल्यास मिळालेल्या गुणातून 20 गुण कमी करण्यात येतील. कमी केलेल्या गुणांतून अंतिम टक्केवारी काढण्यात येईल. परंतु अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या जमाती/ विमुक्त जमाती यांना ही अट लागू नाही.
   चौथ्या व त्यापुढील प्रयत्नात उत्तीर्ण झालेला असल्यास त्यांचा विचार करण्यात येणार नाही.
2. उमेदवरांना डी.ओ.ई.ए.सी.सी. सोसायटीचे (सी.सी.सी.) किंवा (ओ स्तर) किंवा (ए स्तर) किंवा (बी स्तर) किंवा (सी स्तर) स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य आणि तांत्रिकी शिक्षण मंडळाचे एम.एस.सी.आय.टी. किंवा जी.ई.सी.टी. चे प्रमाणपत्रधारक असावा. किंवा सदर प्रमाणपत्र सादर करण्यास सुट देण्याकरिता उमेदवाराने शासनाने वेळोवेळी संगणक हाताळणी/वापराबाबत मान्यता दिलेला अभ्यासक्रम पूर्ण केलेला असावा. तथापि नियुक्तीच्या वेळी उमेदवाराजवळ एम.एस.सी.आय.टी. प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.
3. उमेदवाराकडे शासनमान्य संस्थेचे दूरध्वनीचालक प्रशिक्षणाचे प्रमाणपत्र असावे.
4. उमदवारास स्पष्ट ऐकू येणे आवश्यक आहे. तसेच उमेदवाराचा आवाज मृदू, श्रवणीय व स्पष्ट असावा.

**सर्वसाधारण अटी-**

1.सार्वजनिक आरोग्य खात्याच्या अखत्यारीतील विभाग/कार्यालये यांच्या आस्थापनेवरील 'दुरध्वनीचालक'यांच्या रिक्त पदांच्या प्रमाणात आणि कार्यभार पाहुन कंत्राटी पध्दतीने प्रत्येकी रु.14000/-(चौदा हजार मात्र प्रतिमाह) मानधनावर एक वर्षाच्या कालावधीसाठी प्रत्येकी सहा महिन्यांनी एक दिवसाचा तांत्रिक सेवाखंड देऊन (एका वेळी सहा महिन्यांच्या कालावधीकरिता) स्थानिक पातळीवर कंत्राटी तत्वावरील 'दुरध्वनीचालक'या पदांकरीता अर्ज मागवून निवडीने भरण्यात येतील.

2. सदर कंत्राटी तत्वावरील 'दुरध्वनीचालक'या पदावर निवडलेल्या उमेदवारांकडून 200 रुपयांच्या बॉन्ड पेपरवर करारनामा (प्रतिज्ञापत्र) घेण्यात येईल.

3.कंत्राटी कालावधीत काम करणा-या उमेदवारांची सेवा महापालिकेच्या नियमित तत्वावरील सेवेसाठी सेवाजेष्ठतेसाठी विचारात घेतली जाणार नाही किंवा सेवेचा सेवाजेष्ठतेसाठी प्राधान्य देण्यात येणार नाही. तसेच भविष्यात त्यांना 'दुरध्वनीचालक' पदावर हक्क सांगता येणार नाही.
4. सदर पदे ही कंत्राटी तत्वावर भरावयाची असल्याने उमेदवाराची कमाल वयोमर्यादा ३० वर्षे असावी.
5. रुग्णालय प्रमुखांच्या शिफारशीने असमानधानकारक कामाकरिता किंवा इतर कोणत्याही कारणासाठी कार्यकारी आरोग्य अधिकारी यांच्या स्वाक्षरीने सदर उमेदवारांची सेवा कोणतीही पुर्वसुचना दिल्याशिवाय समाप्त करण्यात येईल.
5. सरळसेवेने 'दुरध्वनीचालक'या संवर्गातील पदे भरल्यानंतर कंत्राटी पध्दतीने नियुक्त केलेल्या उमेदवारांची सेवा तात्काळ समाप्त करण्यात येईल.

<u>कर्तव्येवजबाबदा-या</u>-

1) दुरध्वनीचालक विभागाशी निगडीत अत्यावश्यक सेवा पूरविणे.
2) तीन्ही पाळीमध्ये काम सांभाळणे.
3) कामावर असताना युनिफार्म परिधान करणे.
5) वरिष्ठ पातळीवरुन वेळोवेळी नेमुन दिलेल्या जबाबदा-या पार पाडणे.

वैद्यकीय अधिक्षक क्षयरोग रुग्णालय यांचे कार्यालय येथे जाहिरात प्रसारित झाल्यापासुन (दि. 01.02.2025 पर्यंत) आलेले अर्ज वॉक-इन पध्दतीने निवडण्यात येतील.

**पत्ता- वैद्यकीय अधिक्षक, क्षयरोग रुग्णालय समूह,**
**जेरबाई वाडीया रोड, शिवडी, मुंबई-400015.**
**संपर्क दुरध्वनी क्र.**-02224146993.

सही/-
**वैद्यकीय अधिक्षक**
**क्षयरोग रुग्णालय समूह**